# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ०९/०३/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. २५/०२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. २५/०२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. मिलिंद घरत सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| २ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सॅटेलाईट सिटी योजने अंतर्गत मलनि:स्सारण प्रकल्पांतील Zone-२ च्या कामासाठी मे. घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कंन्स्ट्रक्शन्स प्रा. लि. यांना कामासाठी मुदतवाढ देणेबाबत. | **ठराव :-** वरील प्रस्तावानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत मलनि:सारण प्रकल्पातील Zone-२ च्या कामासाठी नेमलेले ठेकेदार मे.घारपुरे इंजिनिअरींग वसई- विरार एस टी पी प्रा.लि. यांचे विनंतीवरुन व सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांनी केलेल्या शिफारशीनुसार मलनि:सारण प्रकल्पांतील Zone-२ च्या कामासाठी दि. ३१/०५/२०१६ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| ३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेस वाढीव १०० द.ल.ली. <u>(सुर्या टप्पा ३) पाणी पुरवठा योजना राबविणे.</u><br>उपरोक्त योजनेची अशुद्ध व शुद्ध पाणी उपसा पंपीग स्टेशन येथील विज पुरवठा कामी येणाऱ्या खर्चास व कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन ठरविण्यांत आले की, महाराष्ट्र सुवर्ण जंयती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेस वाढीव १०० द.ल.ली. (सुर्या टप्पा ३) पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने विद्युत अतिभार मंजूर केल्यानुसार प्रस्तावित सबस्टेशन पर्यंत विद्युत पुरवठा होण्यासाठी वरील प्रमाणे कामास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. सदर कामी निविदा कार्यवाही करुन काम करण्यास विलंब होणार असल्याने या मुळ योजनेचे मंजूर ठेकेदार मे. घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे यांच्याकडून सदर काम अतिरीक्त बाब म्हणून करुन देयक अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर काम अतिरीक्त बाब म्हणून करण्यास मे. घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे यांनी असमर्थता दर्शविल्यास याकामी स्वतंत्र निविदा मागविण्यांस मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. कांता पाटील सूचक :- मा.श्री. अब्दुल हक पटेल** |
| ४ | प्रभाग समिती 'एच' कार्यक्षेत्रातील अंबाडी रोड पंचवटी हॉटेल समोरील चौक सुशोभिकरण करणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय / वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त प्रस्तावाचा मजकुर पाहता वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अंबाडी रोड पंचवटी हॉटेल समोरील चौक सुशोभिकरणाचे कामांचे होणाऱ्या खर्चास हि सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. तसेच सदर कामाची B-२ निविदा मागविण्यांस वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दीस व याअनुषंगाने होणाऱ्या खर्चास आजही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्री.किशोर पाटील** |

| | | |
|---|---|---|
| ५ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता प्रभाग समिती पुर्वीचा "अ" प्रभाग समिती होती व सध्याचा विरार पूर्व "अे" प्रभाग समिती व विरार पश्चिम "अे" प्रभाग समिती आहे (तात्कालीन नगरपरिषद क्षेत्र) दैनंदिन व आठवडे बाजार शुल्क वसुली तरतुदी बाबत कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरील प्रस्तावित केल्यानुसार रक्कम रू. ६०,२९,९००/- (अक्षरी साठ लाख एकोणतीस हजार नव्वशे रुपये मात्र) व या रक्कमेवर १४% सेवाकर आकारु रक्कम निश्चित करून निविदा प्रक्रिया करणेंस मंजूरी देणेंत येत आहे. तसेच याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दी खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले** |
| ६ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता प्रभाग समिती पुर्वीचा "अ" प्रभाग समिती होती व सध्याचा विरार पूर्व "सी" प्रभाग समिती व विरार पश्चिम "अे" प्रभाग समिती आहे (तात्कालीन नगरपरिषद क्षेत्र) दैनंदिन व आठवडे बाजार शुल्क वसुली तरतुदी बाबत कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरील प्रस्तावित केल्यानुसार रक्कम रू. ७०,२९,९००/- (अक्षरी सत्तर लाख एकोणतीस हजार नव्वशे रुपये मात्र) व या रक्कमेवर १४% सेवाकर आकारु रक्कम निश्चित करून निविदा प्रक्रिया करणेंस मंजूरी देणेंत येत आहे. तसेच याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दी खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.मिलिंद घरत सूचक :- मा.श्रीम.मनिषा जाधव** |
| ७ | वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्र सातिवली असलेल्या आठवडा बाजार व दैनंदिन बाजार कर शुल्क पद्धतीने ई निविदा प्रक्रिया करणेबाबत मान्यता मिळणे. | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा होऊन प्रभाग जी वालिव हद्दीतील क्षेत्र सातीवली येथील दैनंदिन बाजार मंजूर ठेक्याच्या वाढीव दर व वाढते साहित्याचे दर लक्षात घेता सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाच्या बाजार शुल्काच्या ठेक्यात रू. १,७१,२०१/- (अक्षरी एक लाख एक्काहत्तर हजार पाचशे रु. मात्र) १०% वाढ करून सन २०१५-१६ मध्ये रक्कम रू. १८,८३,२१२/- (अक्षरी री. अठरा लाख त्र्याऐंशी हजार दोनशे बारा रु. मात्र) अपेक्षित रक्कम गृहीत धरून तसेच होणाऱ्या लिलाव रक्कमेवर १२.३६% सेवाकर घेण्यास व ई-निविदा प्रक्रिया करून वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिध्दी करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच जाहीर निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत मागील मंजूर निविदा धारकांस मंजूर दराप्रमाणे काम करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्री. अब्दुल हक पटेल** |
| ८ | वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क क्षेत्रातील चंदनसार येथे भरणारा घाऊक बाजार वसुली ई-निविदा काढुन ठेका पद्धतीने देणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (क) कार्यक्षेत्रातील चंदनसार दैनंदिन घाऊक बाजार हद्दीतील बाजारकर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात देण्यांत आलेल्या मंजूर रक्कमेवर १०% वाढ करून सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी बाजार वसुलीस ठेका पध्दतीने देणेंस रक्कम रू. २०,२१,०००/- (अक्षरी विस लक्ष एकविस हजार ) दहा टक्के वाढ करून ती रक्कम २२,२३,१००/- (अक्षरी बावीस लक्ष तेवीस हजार शंबर मात्र) इतकी अपेक्षित रक्कम ग्रहीत धरून तसेच होणाऱ्या लिलाव रक्कमेवर १४% सेवाकर घेण्यांत यावी व ई-निविदा प्रक्रिया करून वर्तमानपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करणेंस ही सभा प्रशासकीय व |

| | | |
|---|---|---|
| | | वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रीक्स** |
| ९ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने / कर्मचारी वर्ग नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अधिकारी/कर्मचारी वर्ग नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (३) नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजूरी वाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक ६ महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी साठी करता येणार नाही. आणि कोणत्याही नेमणूकीचे ऊक्त ६ महिन्यांच्या कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही अशी तरतुद आहे. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभागात यापुर्वी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गाची ६ महिन्यांची कंत्राटी पंध्दतीची सेवा दि.०९/०३/२०१६ रोजी संपुष्टात येत असल्याने वैद्यकीय आरोग्य विभागातील वरील प्रस्तावात नमुद अधिकारी/कर्मचारी वर्गाची आवश्यकता तसेच विभागाची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता सर्व पदांच्या नेमणूका १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून मुलाखतीची प्रक्रिया न करता यापुढे ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने पुढे चालू ठेवणेस ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. कांता पाटील सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले** |
| १० | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०६ (३) मधील तरतुदींनुसार सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील लेखा परिक्षण अहवाल मा. स्थायी समितीपुढे सादर करणे. | **ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालयातील सर्व विभाग, तसेच प्रभाग समिती व त्यांचे अंतर्गत येणाऱ्या उप विभागीय कार्यालयांचे दि. १ एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ या आर्थिक वर्षातील लेखा परिक्षण अहवाल सादर करण्यात आला असुन सदर वार्षिक लेखा परिक्षण अहवाल संबंधित विभागास पाठवणेस मान्यता देण्यात येत आहे. संबंधित विभागाने लेखा परिक्षण अहवालातील आक्षेपांची/ त्रुटींची पुर्तता करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल तीन महीन्याचे मुदतीत लेखापरिक्षण विभागास सादर करणेत यावा.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रीक्स सूचक :- मा.श्रीम.मनिषा जाधव** |